**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, AUG-SEPT, 2021, VOL-9/47

# भगतसिंग यांचे जीवन व कार्य एक चिकित्सक अभ्यास

**प्रा रविंद्र बाबुराव जाधव, Ph.D.**
*इतिहास विभाग. श्रीमती इंदिरा महादेव बेहरे कला, श्रीमान चंदुलाल सेठ वाणिज्य व श्रीमंती शोभनाताई चंदुलाल सेठ विज्ञान महाविद्यालय, खेड. तालुका खेड.जिल्हा. रत्नागिरी*

**प्रस्तावना:-**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास हा रोमहर्षक आहे. ब्रिटिशांनी सहजासहजी भारतीय लोकांना स्वातंत्र्य दिले नाही. मवाळ कालखंड. जहालवादी कालखंड. महात्मा गांधींचा कालखंड, क्रांतिकारक, आझाद हिंद सेना असे अनेक माध्यमातून भारतीय लोकांनी स्वतःच्या न्यायहक्कासाठी ब्रिटिशांशी संघर्ष केला, एकच विचार स्वातंत्र.

क्रांतिकारकांना गुलामी मान्य नव्हती. स्वातंत्र्य यासाठी हुतात्म व्हायला देखील तयार होते. या क्रांतिकारका मध्ये राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम, देशभावना, मोठ्या प्रमाणात होती. स्वातंत्र्य हेच त्यांचे जीवन होते.

भगतसिंग यांनी स्वतःच्या विचाराने तरुण वर्गात वैचारिक जडण-घडण निर्माण केली, त्यांनी तात्विक बैठक तरुण वर्गात निर्माण केली. तरुण वर्ग हा त्यांच्या विचाराने प्रभावित होऊन स्वातंत्र्य संग्राम मध्ये सहभागी झाला. तरुण वर्ग संघटित होऊ लागला. भगतसिंग यांनी क्रांतिकारक संघटना स्थापन केल्या, या क्रांतिकारक संघटनेत सहभागी झालेला तरुण हा भारतीय लोकांवर झालेला अन्याय याला विरोध करू लागला. भारतीय लोकांच्या न्याय्य हक्कासाठी संघर्ष करत.

**शोध निबंधाचा उद्देश:-**

1)भगतसिंग यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास करणे
2) भगतसिंग यांच्या क्रांतिकारक विचारसरणीचा मागोवा घेणे.
3) भगतसिंग यांच्या क्रांतिकारक विचारसरणी आणि कृती याचा तुलनात्मक अभ्यास करणे
4) भगतसिंग यांच्या क्रांतिकारक संघटनेचा अभ्यास करणे
5) भगतसिंग यांच्या परिवारातील सदस्य यांची ऐतिहासिक माहिती अभ्यासने
7) भगतसिंग यांच्या जीवनावर रशियन राज्यक्रांतीचा प्रभाव अभ्यासणे
8) भगतसिंग यांनी साँडर्स यांची हत्या केली याचे कारण अभ्यासणे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**1)भगतसिंग यांच्या परिवाराचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदान :-**

भगतसिंग यांचे वडील किशन सिंग यांनी गदर पार्टीचे सभासदत्व घेऊन गदर पार्टीच्या माध्यमातून स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश यांच्याशी सतत संघर्ष केला. अर्जुन सिंग यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र उठाव उभा केला. सुवर्ण सिंग यांनीसुद्धा ब्रिटिशांशी संघर्ष केला.

**2) भगत सिंग यांचे बालपण:-**

भगतसिंग यांचा जन्म 28 सप्टेंबर 1907 साली बंगा जिल्ह्यातील लायलपूर येथे झाला भगतसिंग यांच्या वडिलांचे नाव किशन सिंग आईचे नाव विद्यावती या उभयंताचे पोटी भगतसिंग यांचा जन्म झाला.

**3) भगतसिंग यांचे शालेय शिक्षण ते महाविद्यालयीन शिक्षण प्रवास:-**

भगतसिंग यांनी गावातील प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला गावातील पाचवीपर्यंत शिक्षण पूर्ण करून त्यांनी पुढील शिक्षण दयानंद अॅग्लो हायस्कूल मध्ये घेतले महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी लाला लाजपत राय नॅशनल कॉलेजमध्ये घेतले इंग्रजी,उर्दू,संस्कृत,हिंदी या सर्व भाषांवर प्रभुत्व त्यांचे होते. शालेय जीवनामध्ये त्यांनी परकीय कपड्याची होळी करून स्वदेशी कपड्याचा पुरस्कार ,खादी कपड्याचा प्रसार आणि प्रचार केला.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना जयचंद्र विद्यालंकार शिक्षकांनी भगतसिंग यांच्यात देशभक्ती ,देश प्रेम ,राष्ट्रवाद, देशासाठी त्याग यासंबंधीचे मार्गदर्शन त्यांनी केले. रशियन राज्यक्रांती चा प्रभाव त्यांच्या जीवनावर होता.

**4)भगतसिंग यांनी लिहिलेली पुस्तके:-**

भारतातील स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, समाजवाद, आत्मचरित्र, मृत्यूचा दरवाजा ग्रंथ भगतसिंग याने लिहिली.

**5) भगतसिंग आणि गुप्त क्रांतिकारक संघटना:-**

हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन नवजवान भारत सभा, सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी, या संस्थेच्या कार्यात भगतसिंग होते...[1]

**6) सायमन कमिशन:-**

सायमन कमिशनला भारतात मोठ्या प्रमाणावर विरोध करण्यात आला. सायमन कमिशन लाहोर येथे भेट दिली लाहोर येथील निदर्शनाचे नेतृत्व लाला लजपत राय यांनी केले. डी. एस. पी. स्कॉट आणि डी.वाय.एस.पी. सॉंडर्स यांनी लाला लजपत राय यांच्यावर लाठी हल्ला करण्यात आला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय जखमी झाले. आणि त्यांचा मृत्यू 17 नोव्हेंबर 1928 झाला. यांच्या मृत्यूला जबाबदार व्यक्ती स्कॉट आहे आणि त्याचा वध करण्याचा निर्णय भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आझाद आणि जयगोपाल यांनी घेतला.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

स्कॉट हे येत आहेत.असे समजुन राजगुरू यांनी त्यांच्या वर गोळी घातली. त्यानंतर भगतसिंग यांनी जवळ जाऊन त्यांच्यावर गोळ्या घातल्या पण प्रत्यक्षात स्कॉट समजून साँडर्स यांची हत्या करण्यात आली. साँडर्स यांच्या हत्येचे समर्थन करणारे पत्र शहरात वाटण्यात आली..[2]

**7) असेब्ली मध्ये बॉम्बस्फोट:-**

8 एप्रिल 1929 या दिवशी असेब्ली मध्ये भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त उपस्थित होते. ट्रेड डिस्प्युट बिलावर चर्चा होऊन पास करण्यात आले.तेव्हा भगतसिंग यांनी सभागृहात रिकाम्या जागी बॉम्ब फेकला आणि स्फोट झाला. दुसरा बॉम्ब बटुकेश्वर दत्त यांनी टाकला. हा बॉम्ब टाकण्याचा उद्देश आणि हेतू कोणाला इजा किंवा दुखापत करणे नव्हता. यामागचे ऐतिहासिक पार्श्वभूमी ट्रेड डिस्प्युट बिल आणि पब्लिक सेफ्टी बील तसेच ब्रिटिशांच्या हुकूमशाही वृत्तीचा निषेध करण्यासाठी असेब्ली मध्ये बॉम्बस्फोट केला.भगतसिंग यांनी छताच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या याची इतिहासात नोंद आहे आणि इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणा देऊन पत्रक सभाग्रहात फेकण्यात आली. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त हे पोलिसांच्या स्वाधीन झाले. या कृतीसाठी ब्रिटिश न्यायव्यवस्थेने भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांना आयुष्यभर देशाबाहेर घालवण्याची शिक्षा दिली..[3]

**8)लाहोर कट खटला:-**

भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, इतर तरुण क्रांतिकारक यांना आरोपी म्हणून ब्रिटिशांनी न्याय व्यवस्थे पुढे आणले. पाच महिने हा खटला चालला त्यानंतर न्यायव्यवस्थेने भगतसिंग, राजगुरू,सुखदेव यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली.[4]

**निष्कर्ष:-**

ब्रिटिश प्रशासन व्यवस्था जी अन्यायकारक दडपशाही करणारी होती. भारतीय लोकांना कधीही न्यायाने वागवले नाही. ब्रिटिश प्रशासन व्यवस्थेची विचारसरणी आणि कार्यपद्धती ही भारतीय समाज व्यवस्थेच्या विरुद्ध होती. ब्रिटिशांनी भारतीयांना दिलेली अन्यायकारक वागणूक ही क्रांतिकारकांना मान्य नव्हती.त्या काळातील युवा क्रांतिकारक भगतसिंग 'शहीद-ए-आझम' म्हणून ही गौरवले जाते. यांनी पूर्ण आयुष्य देशा साठी दिले. भारतीय क्रांतिकारक यांची स्वतःचा वेगळी विचारसरणी होती. स्वतःच्या विचारातून एक तात्विक बैठक समाजव्यवस्थेला दिली. आपल्या विचाराने तरूण वर्गाला एकत्र या क्रांतिकारकांनी आणले. त्यांनी स्वतःचा कार्यातून इतिहासाला नोंद घ्यायला लावले असे व्यक्तिमत्त्व क्रांतीकारक चे होते.भारतीय लोकांच्या न्याय हक्कासाठी लढणारे हे क्रांतिकारक होते.

15 ऑगस्ट 1947 या दिवशी भारताला स्वातंत्र्य मिळाले.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संदर्भ ग्रंथ**

*आधुनिक भारत (1760 ते 1950) डॉ.श.गो.कोलारकर.मंगेश प्रकाशन पृष्ठ. क्रमांक 322*
*आधुनिक भारत का संपूर्ण इतिहास एस.एल.नागोरी,काव्या नागोरी सबलाइम पब्लिकेशन्स पृष्ठ. क्रमांक.108.*
*आधुनिक भारताचा इतिहास 1920-1947. डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर श्री साईनाथ प्रकाशन. पृष्ठ क्रमांक.190*
*A new look on modern India history.B.l.Grover.S.Chand Published Pages.no .410.*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*